# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/09/2023 (मंगळवार) दुपार

## चोरी

**१) पो.स्टे. काटोल** – अंतर्गत वाघोडा ता. काटोल येथे दिनांक १७/०९/२०२३ चे २२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. लताबाई केशवराव गजबे, वय ६० वर्ष ही बकरी चारण्याचे काम करते फिर्यादीच्या गोठयात ८ बकऱ्या असुन रोज १०.०० वा. ती चारायला नेते व सायंकाळी ५.०० वा. परत येते व घरासमोर बांधत असते. दि. १८/०९/२०२३ चे सकाळी अंदाजे ००.४२ वा. सुमारास घरासमोर बकऱ्याचा आवाज ऐकुन उठुन पाहिले असता घरासमोर बांधलेल्या बकऱ्याच्या कळपातील १ पांढऱ्या रंगाचा १ वर्षाचा मोठा बोकडया व १ चितळाबाहडा रंगाचा १ वर्षाचा मोठा बोकडया व २ पांढऱ्या रंगाचा २ वर्षाचा मोठा बोकडया हा फिर्यादिला दिसला नाही फिर्यादीचे मालकिचे १ पांढऱ्या रंगाचा १ वर्षाचा मोठा बकऱ्याची किंमत ५०००/–रू चा व १ चितळाबाहडा रंगाचा १ वर्षाचा मोठा बोकडयाची किंमत ५०००/–रू तसेच २ पांढऱ्या रंगाच्या २ वर्षाचा मोठया बकऱ्या प्रत्येकी ३०००/– रू. च्या असा एकुण १६०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा निलेश सुरेशराव उईके हे करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत १५ किमी अंतरावर मौजा कान्हादेवी येथे दिनांक ०८/०९/२०२३ चे १८.०० वा. ते दिनांक ०९/०९/२०२३ चे ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुधाकर धनराज नेवारे, वय ३६ वर्ष, रा. कान्हादेवी ता. पारशिवनी जिल्हा नागपूर हा त्याचे शेतात काम करुन संध्याकाळी शेतीचे साहीत्य शेतातील उघडया झोपडीमध्ये ठेवुन घरी निघुन गेले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी शेतातील झोपडीत शेतातील साहीत्य घेण्यास आले असता त्यांना त्यांचा शेतातील झोपडीत ५ नग स्पिंकलर किंमती अंदाजे ४०००/– रुपयाचा मुद्देमाल दिसुन आला नाही. तेव्हा फिर्यादीने त्यांचा शेतातील साहीत्याचा आजुबाजुचा शेतात शोध घेतला पण त्याचे शेतामधील स्पिंकलर मिळुन आले नाही कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा./१७८४ दिलीप टेकाम मो. क्र. ९७६४९३३५५४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**